# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 31.07.2024** **वार – बुधवार**

---

**समिती**

पुण्यात सिंहगड रस्त्यावरील एकतानगर भागात पुराचं पाणी शिरल्याची दखल घेत त्याची कारणमीमांसा करण्यासाठी पुणे महापालिकेने तीन जणांची समिती नेमली आहे. या समितीत पुणे महापालिकेचे अधीक्षक अभियंता साहेबराव दांडगे, दिनकर गोंजारी, बिपिन शिंदे आणि पाटबंधारे विभागाच्या अधीक्षक अभियंता सुनंदा जगताप यांचा समावेश आहे अशी माहिती महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी दिली. या समितीला अहवाल सादर करण्यासाठी सात दिवसांची मुदत दिली आहे.

**पुणे**

दरम्यान, यापूर्वी मुठा नदी पात्रातून 40 हजार क्युसेकच्या दुपटीहून अधिक पाणी सोडल्यानंतरही कधी जी पूर परिस्थिती निर्माण झाली नव्हती ती गेल्या आठवड्यात का निर्माण झाली असा प्रश्न उपस्थित करत पुण्यातील विविध सामाजिक, स्वयंसेवी संस्था आणि राजकीय पक्षांनी पुणे बचाव मोहीम हाती घेतली आहे. सर्वप्रथम नदी सुधार योजनेबद्दलच्या सर्व शंकांचं निरसन होत नाही तोपर्यंत या प्रकल्पाचं काम थांबवण्याची मागणी यात सहभागी संघटनांनी केली आहे.

**किटकजन्य**

पुणे शहरात पुराच्या पाण्यामुळे जलजन्य आजारासह कीटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव वाढण्याचा धोका असलेल्या भागांमध्ये महापालिकेच्या आरोग्य अधिकाऱ्यांनी पाहणी केली. पूरग्रस्त भागात नागरिकांना तत्काळ आरोग्य सेवा देण्यासाठी फिरती वैद्यकीय पथकं नेमली आहेत. महापालिकेच्या सर्व दवाखान्यांमध्ये भरपूर औषधसाठा ठेवण्यात आलेला आहे. आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून पूरग्रस्त भागात घरोघरी भेट देऊन रुग्णांचं सर्वेक्षण करण्यात येत आहे असं आरोग्यप्रमुख डॉक्टर निना बोराडे यांनी सांगितलं.

**झिका**

पुण्यात झिकाबाधित असलेल्या दोन ज्येष्ठ नागरिकांचा मृत्यू झाला. त्यांना झिका संसर्गासोबत ह्दयविकार, यकृताचा आजार, मधुमेह अशा सहव्याधी होत्या. त्यामुळे त्यांचा मृत्यू नेमका कशामुळं झाला याबाबत राज्य शासनाकडून मृत्यूची तपासणी म्हणजे डेथ ऑडिट होणार आहे. याबाबत महापालिकेच्या आरोग्य विभागानं सार्वजनिक आरोग्य विभागाशी पत्रव्यवहार केला आहे असं सहायक आरोग्य अधिकारी डॉक्टर सुर्यकांत देवकर यांनी सांगितलं.

**निलंबित**

बेवारस रुग्णाला सुटी न देता मध्यरात्री येरवडा मनोरुग्णालयाच्या परिसरात सोडून दिल्याप्रकरणी ससून रुग्णालय प्रशासनानं आणखी एका डॉक्टरला निलंबित केलं आहे. यापूर्वी निलंबित केलेल्या डॉक्टरला मदत केल्याचं चौकशी समितीच्या अहवालातून स्पष्ट झाल्यानंतर ससून रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉक्टर एकनाथ पवार यांनी ही कारवाई केली. दोन्ही निवासी डॉक्टरांना एका शैक्षणिक सत्रासाठी महाविद्यालय आणि वसतिगृहातून काढून टाकण्याची शिफारसही महाविद्यालयानं केली आहे.

**वारसा**

महाराष्ट्रातील गड किल्ल्यांचा समावेश संयुक्त राष्ट्र संघाच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत व्हावा यासाठी सप्टेंबर महिन्यात एक जागतिक समिती राज्याच्या भेटीवर येणार आहे. पुरातत्व विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार शिवनेरी, लोहगड, राजगडसह साल्हेर, रायगड, प्रतापगड, पन्हाळा, सुवर्णदुर्ग, खांदेरी, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग आणि तामिळनाडूतील जिंजी या 12 किल्ल्यांचा यात समावेश आहे. यानिमित्तानं प्रमुख किल्ल्यांचं दस्तऐवजीकरण करण्यासाठी विविध सामाजिक संस्था आणि शाळांमधील शिक्षकांची मदत घेतली जाणार आहे.

**मोळक**

वारकरी संप्रदायाची परंपरा जपून वाटचाल करीत असलेल्या ज्ञानेश्वर मोळक यांनी महापुरुषांच्या सुसंवादाची भूमिका आयुष्यभर जपली असे गौरवोद्गार ज्येष्ठ लेखक डॉक्टर श्रीपाल सबनीस यांनी आज काढले. फुले-शाहू-आंबेडकर विचारमंचतर्फे साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त पुणे महापलिकेचे निवृत्त अतिरिक्त आयुक्त, ज्ञानेश्वर मोळक यांचा सत्कार करताना डॉक्टर सबनीस बोलत होते.

**पुरस्कार**

साहित्यदीप प्रतिष्ठनतर्फे गझलकार अनिल कांबळे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ देण्यात येणारा गझलदीप पुरस्कार यंदा सुरेश भट गझलमंचाचे संस्थापक अध्यक्ष शाहीर सुरेशकुमार वैराळकर यांना जाहीर झाला असून, तो उद्या पुण्यात प्रदान करण्यात येईल. यावेळी गझलरंग हा विनामूल्य कार्यक्रम होणार आहे.

**दामले**

महाराष्ट्रीय मंडळाद्वारे कॅप्टन शिवरामपंत दामले स्मृतीदिनानिमित्त आंतरशालेय क्रॉस कंट्री स्पर्धेचं आयोजन उद्या 1 ऑगस्ट रोजी करण्यात आलं आहे. महाराष्ट्रीय मंडळाचं हे सुवर्ण महोत्सवी आणि स्पर्धेचं अकरावं वर्ष आहे. पुणे जिल्ह्यासाठी सहा गटातील अकरा, बारा आणि पंधरा वर्षातील मुला-मुलींना एक लाख रुपयांची बक्षिसं देण्यात येणार आहेत.

**पाणी**

पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणसाखळीत आज सकाळी सहा वाजेपर्यंत 88 टक्के म्हणजे 25 टीएमसीहून अधिक पाणीसाठा झाला आहे. वरसगाव धरण 88 टक्के, टेमघर 87 तर पानशेत धरण 91 टक्के भरलं आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**